# उत्तर आफ्रिका–मध्यपूर्व : अपरिपक्व राजकीयीकरणाचा परिणाम

**चंद्रशेखर पुरंदरे**

उत्तर आफ्रिका व मध्यपूर्वेतील सध्याची हिंसा प्रामुख्याने अपरिपक्व राजकीयीकरणाचा परिणाम म्हणता यावा. ही हिंसा काबूत आणण्यासाठी अशा संघर्षग्रस्त प्रदेशात इतर देशांनी सशस्त्र हस्तक्षेप करावा का हा संलग्न मुद्दा आहे. माली, इजिप्त व सीरिया या देशांची सद्य:स्थिती या दृष्टीने पाहू.

हुकूमशाहीला सार्वत्रिक विरोध, हुकूमशाहा जाणे व लोकशाही येणे मग लोकशाही धोक्यात येणे - ही या प्रदेशातील अर्वाचीन प्रक्रिया दिसते. त्या अनुषंगाने सीरिया पहिल्या टप्प्यावर, इजिप्त दुसऱ्या व माली तिसऱ्या टप्प्यावर दिसतात. प्रथम मालीमधील परिस्थिती पाहू म्हणजे हे विधान स्पष्ट होईल.

वर म्हटलेले राजकीयीकरण ही प्रक्रिया आहे. राजकारण हे त्याचे दृश्य रूप असते. मतभेदांचा निवाडा फक्त हिंसेने होऊ शकतो या भूमिकेला राजकारण पर्याय देते. विरोधी मतप्रवाह, त्यांची अभिव्यक्ती, त्यासाठी लोकांचा पाठिंबा मिळवणे या गोष्टींना परिपक्व राजकारणात मंजुरी असते. त्यानंतर विरोधकांना सत्तेत सहभाग किंवा सत्ता मिळण्याची शक्यता दिसू शकतात. सामान्य माणसालाही आपल्या तक्रारी निदान नोंदवण्याची तरी मुभा असते. यामुळे मतभेद किंवा वाद बहुधा हिंसेपर्यंत पोचत नाहीत. या प्रक्रियेचा अभाव असला की 'बळी तो कान पिळी' हा जंगलाचा न्याय पुढे येतो.

असे राजकीयीकरण रातोरात अस्तित्वात येत नाही. त्यासाठी समाजाची मनोभूमिका काही पिढ्या तयार व्हायला लागते. युरोपमध्ये या सहस्रकात ही प्रक्रिया सुरू झाली. अमर्त्य सेन यांच्या मते भारतात संवादाची प्राचीन परंपरा त्या आधीपासून आहे. हे राजकीयीकरण इराक किंवा अफगाणिस्तान चुटकीसरशी येईल असा पश्चिमेचा तेथील हस्तक्षेपामागचा होरा होता. तसे झाले नाही कारण तसा संवाद किंवा औपचारिक/अनौपचारिक संस्थाच राष्ट्रीय स्तरावर अस्तित्वात नव्हत्या. या परंपरेमुळे सध्याच्या रूपातील लोकशाही स्वातंत्र्यानंतर भारतात रूजणे शक्य झाले तर त्याचवेळी स्वतंत्र झालेल्या पाकिस्तानात वारंवार होणाऱ्या लष्करी हस्तक्षेपाने ही प्रक्रिया खंडित होत राहिली.

उत्तर आफ्रिका - मध्यपूर्वेत ही संवादाची परंपराच निर्माण झाली नाही. इस्लाम सांस्कृतिकदृष्ट्या बहरात होता तोपर्यंत सहिष्णुता, इतर संस्कृतींशी देवघेव, कलास्वातंत्र्य अस्तित्वात होते. नंतरच्या दमनकारी हुकूमशाह्या, वसाहतवाद व स्वातंत्र्यानंतरच्या परतच्या लष्करशाही/हुकूमशाहीमुळे राजकीयीकरणाला खीळ बसली. त्याचबरोबर, विशेषत: कमी तेल असणाऱ्या किंवा नसणाऱ्या देशात आर्थिक वाढही खुंटली आणि त्यातून उद्भवणाऱ्या सामाजिक अशांततेला वैध अभिव्यक्तीचा मार्गच राहिला नाही.

मालीमधील या प्रक्रियेचे परिणाम पाहू. आग्नेय आफ्रिकेतील या देशाचा उत्तर भाग सहारा वाळवंटाखाली येतो. दीड कोटी लोकसंख्येतील निम्मे दारिद्र्यरेषेखाली आहेत. बहुतांशी लोकसंख्या दक्षिणेत आहे. उत्तरेत तुआरेग(Tuareg) ही भटकी जमात मुख्यत: आढळते. एकूण लोकसंख्येच्या १०% तुआरेग जमातीचे लोक आहेत. समाजशास्त्राच्या दृष्टीने १०% च्या आसपासचे अल्पसंख्य राष्ट्रीय धोरणासाठी संवेदनाशील ठरतात. उदाहरणार्थ, भारतातील मुस्लिम किंवा अमेरिकेतील कृष्णवर्णीय. तुआरेग माली शेजारच्या नायजर, बुर्किना फासो या देशातही आहेत. कुर्द किंवा नागा लोकांप्रमाणे त्यांचे सीमापार संबंध शाबूत आहेत कारण वसाहतवादानंतरचे राष्ट्राचे नकाशे 'वरून' लादण्यात आले. त्यांनी अशा जमातींचा पारंपारिक भूगोल लक्षात घेतला नाही, त्यामुळे १९६० साली माली फ्रेंच वसाहतीतून स्वतंत्र झाला तेव्हापासून तुआरेगना मालीमध्ये झालेला समावेश नामंजूर आहे. दर दशकात त्यांचे केंद्रसत्तेविरुद्ध उठाव होत असतात. त्यांची स्वायत्ततेची मागणी आहे. असा अलिकडचा उठाव मागच्या वर्षीच्या जानेवारीत पुन्हा झाला. तो पाहण्याआधी मालीची सहिष्णु परंपरा पाहू.

१९ व्या शतकापर्यंत उत्तर आफ्रिकेतील तीन प्रमुख साम्राज्यांपैकी माली हे एक साम्राज्य होते. १३-१४ व्या शतकापर्यंत टिंबक्टू हे शहर तर इस्लामी संस्कृतीचे व उत्तर आफ्रिकेतील व्यापाराचे प्रमुख केंद्र होते. सूफी हा सहिष्णु इस्लामी संप्रदायही टिंबक्टूतील प्रमुख संप्रदाय होता. परवापरवापर्यंत तेथे सुमारे तीनशे सूफी संतांची स्मारके, मंदिरे होती. त्याचबरोबर प्रचंड ग्रंथालयात प्राचीन नकाशे, दस्तऐवज जपून ठेवलेले आहेत. १९ व्या शतकात फ्रेंच आले, १९६० ला देश स्वतंत्र झाला. पण नंतर १९९१ पर्यंत लष्करशाही किंवा एकपक्षीय राजवटी आल्या. १९९१ ला लोक, विशेषत: विद्यार्थी राजवटीविरुद्ध रस्त्यावर आले. आताच्या अरब वसंताप्रमाणेच शांततापूर्ण निदर्शनांवर लष्कराने गोळीबार केला पण विरोध वाढल्याने हुकूमशहाचा पाठिंबा लष्कराने काढून घेतला व लोकशाही आली. हाच घटनाक्रम

ट्युनिशिया, इजिप्तमध्ये वीस वर्षांनी दिसून आला. लोकशाही येऊनही तुआरेगचा केंद्र सरकारला विरोध कायम राहिला. या जमातीचे बरेच लोक लिबियाचा हुकूमशहा गडाफी याच्याकडे भाडोत्री सैनिक होते. गडाफीच्या पाडावानंतर ते गतवर्षी मालीमध्ये परत आले. त्यांना सैनिकी शिक्षण होते आणि लिबियाच्या सैन्यातील आधुनिक शस्त्रेही त्यांच्याकडे होती. त्यामुळे तुआरेगच्या मागच्या वर्षीच्या जानेवारीच्या उठावाला हा मोठाच सबळ पाठिंबा मिळाला. दरम्यान अल्-कईदा या मुस्लिम मूलतत्त्ववादी संघटनेने अनेक नावांखाली सगळ्याच प्रदेशात (आफ्रिका, मध्यपूर्व) हातपाय पसरायला सुरूवात केली होती. त्यांना तर कोणतेच राष्ट्र-राज्य मान्य नाही. कडव्या इस्लामची स्थापना हा त्यांचा एककलमी कार्यक्रम आहे. अल्-कईदाचे धर्मवीर मालीबाहेरून आलेले आहेत. त्यांचे नेते बेल मोख्तर व अबू वादूद दोघेही अल्जीरिअन आहेत. तुआरेग भूमिपुत्र. त्यांच्या स्वायत्ततेच्या मागणीत अल्-कईदाला रस नाही पण केंद्रसत्ता उलथणे या एका कार्यक्रमावर दोन्ही गट एकत्र आले आणि जवळजवळ सगळा उत्तर माली गेल्या वर्षी त्यांच्या अखत्यारीत आला. या प्रदेशात पर्यटक म्हणून आलेल्या, तंत्रज्ञ म्हणून आलेल्या गोऱ्यांना पळवून खंडणी वसूल करणे हा अलकईदाचा पैशाचा एक स्रोत. दुसरा म्हणजे अंमली पदार्थ, सिगारेटस् व शस्त्रांचे स्मगलिंग. एक फरक लक्षात घेतला पाहिजे तो म्हणजे अफगाणिस्तानात अल्-कईदा सक्रिय होती तरी अफगाणिस्तानावर सत्ता त्यांची नव्हती. उत्तर मालीत सत्ताच त्यांच्या हातात आली. त्याबरोबर शरिया कायद्याची कडक अंमलबजावणी सुरू झाली. साध्या गुन्ह्यांबद्दल हात तोडणे, सार्वजनिक फटके, रस्त्यावर धूम्रपानास बंदी, स्त्रियांना बुरखा घालण्याची सक्ती, पँट घालायला स्त्रियांना बंदी, नाच-गाण्याला बंदी (काश्मीरमधील मुलींच्या रॉकबँडप्रमाणेच) वगैरे नुसते जाचक नव्हेत तर दहशतीखालचे उपक्रम (तालेबानसारखेच) सुरू झाले. त्यामुळे या जानेवारीत तुआरेगने त्यांच्याशी फारकत घेतली. पण उत्तरेकडून दक्षिणेतल्या राजधानीकडे या विरोधकांची वाटचाल या जानेवारीत सुरू झाली. मालीचे सैन्य अक्षम असल्याने व केंद्र सरकार दुबळे असल्याने राष्ट्राध्यक्षाने फ्रान्सला हस्तक्षेप करण्याची विनंती केली व ११ जानेवारीला फ्रान्सने हवाई कारवाई व सैन्य तैनात केले. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत (लेख लिहीपर्यंत) या हस्तक्षेपाचा पहिला टप्पा पार पडलेला दिसतो. तो म्हणजे उत्तर मालीतून अल्-कईदाला हुसकावून लावणे. स्थानिकांनी फ्रेंच सैन्याचे मुक्तिसेना म्हणून स्वागत केले. तालेबानच्या पाडावानंतरच्या अफगाणिस्तानसारखीच ही परिस्थिती आहे.

या हस्तक्षेपाचा विरोध म्हणून अल्जीरियातील एका इंधनवायू बनवणाऱ्या कारखान्यावर अल्-कईदाने हल्ला केला. सगळा कारखानाच - हजारभर कर्मचाऱ्यांसकट - ओलीस ठेवला. मग अल्जिरियन सरकारने लष्कर धाडून दहशतवाद्यांना ठार मारले पण त्यात काही पाश्चात्य व जपानी तंत्रज्ञही ठार झाले. जग जवळ येत असल्याचे हे उदाहरण. त्यात भर म्हणून आता अमेरिका उत्तर आफ्रिकेत माणसे मारणाऱ्या स्वयंचलित विमानांचा तळ उभारणार आहे. म्हणजे, पाकिस्तानच्या वझिरीस्तान प्रांतातील हल्ल्यांप्रमाणेच, निष्पाप दहा तर एखादा आतंकवादी बळी जाणार.

त्यामुळे फ्रान्सचा प्रवेश तर झाला, पण मालीच्या सैन्याला प्रशिक्षण देणे, आफ्रिकन सैन्याला मालीमध्ये मार्गदर्शन करणे, राष्ट्र स्थिर करणे व तुआरेगची फुटीरता संभाळणे असे पुढचे बरेच उपक्रम अल्-कईदाच्या सावलीत आखावे लागतील.

आता या संदर्भात साम्राज्यवादाचा मुद्दा तपासायला हवा. बऱ्याच वेळा सशस्त्र परकीय हस्तक्षेपाखेरीज स्थानिक प्रश्न सुटत नाहीत ही आंतरराष्ट्रीय वस्तुस्थिती आहे. युनोच्या ठरावांना फारशी किंमत राहत नाही. असा निर्णायक हस्तक्षेप अर्थातच स्थानिकांपेक्षा वरचढ लष्करी सामर्थ्य असणारा देश किंवा देशांची संघटना करू शकते. म्हणजे अमेरिका किंवा पाश्चात्य राष्ट्रे किंवा NATO सारखी संघटना. पेच निर्माण होतो तो या राष्ट्रांच्या ऐतिहासिक वर्तनामुळे. ब्रिटन, फ्रान्स, बेल्जियम, हॉलंड यांच्या वसाहती ६०-७० वर्षांपूर्वीपर्यंत जगभर होत्या. त्यामुळे त्यांचा हस्तक्षेप हा वसाहतवादाचाच आजचा अवतार मानले जाणे स्वाभाविक आहे. पण तसे मानण्याने राष्ट्रांतर्गत हिंसाचार कसा थांबवायचा या प्रश्नाला उत्तर मिळत नाही. परकीय हस्तक्षेप केलाच नाही तर काय होते हे काही वर्षांपूर्वी आफ्रिकेतील रवांडा या देशात दिसून आले. तेथे ६ एप्रिल १९९४ पासून जुलैच्या मध्यापर्यंत, म्हणजे सुमारे १०० दिवसांत ८ ते १० लाख लोक मारले गेले. हुतू व तुत्सी या दोन जमातीतील वैराचा हा परिणाम. विसाव्या शतकातील हे एक भयानक हत्याकांड होते. पूर्व युरोपातील बाल्कन देशात १९९८ साली अमेरिका व नाटोने सशस्त्र हस्तक्षेप केला नसता तर तेथील मुस्लिमांचे शिरकाण चालूच राहिले असते किंवा त्याआधी भारताने पूर्व पाकिस्तानात हस्तक्षेप केला नसता तर तेही हत्याकांड चालू राहिले असते.

आजचा साम्राज्यवाद भौगोलिक असण्यापेक्षा आर्थिक असतो. आता फ्रान्स, मालीहून आपला व्यापारी फायदा कसा करायचा, यामागे लागणार हे उघड आहे. (त्याबरोबर ब्रिटन, कॅनडा, डेन्मार्क आणि अमेरिका - त्यांनी फ्रान्सच्या कारवाईसाठी जड वाहतूक करणारी विमाने पुरवली.) नि:स्वार्थी हस्तक्षेप फक्त युनो करेल किंवा मालीच्या संदर्भात आफ्रिकन देशांचे संयुक्त सैन्य. पण गेल्या वर्षभरात दोघांनीही काही केले नाही. अजूनही नायजेरियन सैन्य मालीत येण्याची प्रतीक्षाच आहे. अल्-कईदाचे जिहादी आता स्थानिक सहानुभूती असणाऱ्यांच्यात भूमिगत झाले आहेत.

जाण्याआधी टिंबक्टूमधील सूफी संतांची प्राचीन स्मारके, ग्रंथालये यांचा विध्वंस मात्र त्यांनी केला. माली या देशाचाच नाही तर जागतिक सांस्कृतिक वारसा त्यात बळी पडला. हा प्रकारही आपल्याकडच्या तक्षशिला, नालंदाच्या विध्वंसासारखा किंवा मूर्तिभंजनासारखाच आहे. तुआरेगखेरीज इतर वंशाचे लोक वर्षभराच्या यादवीने दक्षिणेकडे रवाना झाले. हे विस्थापित काही लाखात जातील. स्थानिक हिंसा व हे विस्थापन थांबवायला त्या देशाचे सरकार अपुरे पडले. म्हणजे प्रश्न अल्-कईदाचा साम्राज्यवाद-तुआरेगची स्वायत्तता व फ्रान्सची कारवाई या अंगाने पहायला हवा.

अपुऱ्या राजकीयीकरणाचा माली हा तिसरा टप्पा आहे असे लेखाच्या सुरूवातीला म्हटले कारण हुकूमशाही गेली, लोकशाही आली पण तीही धोक्यात आली. आता इजिप्त या दुसऱ्या टप्प्यावरच्या देशाची परिस्थिती पाहू. दोन वर्षांपूर्वी होस्ने मुबारक हा हुकूमशहा जनरेट्याखाली गेला. निवडणुका झाल्या व निर्वाचित सरकारही सत्तेवर आले. पण शांतता नाही. कारण लष्कर व न्यायसंस्था अजून मुबारक समर्थकांनीच भरलेल्या संस्था आहेत. निर्वाचित सरकारचा ग्रह असा आहे की मुस्लिम मूलतत्त्ववादाच्या दिशेने इजिप्त जावा म्हणून त्यांची निवड झाली. लोकांना ना लष्कर हवे आहे ना मूलतत्त्ववादी इस्लाम. त्यामुळे अशांतता आहे. पाकिस्तानसारखीच लष्कराची निर्वाचित सरकारवर नजर आहेच. या परिस्थितीच्या विरोधात लोक परत रस्त्यावर आले आहेत आणि मारले जात आहेत. पोर्ट सैद या शहरातील फुटबॉल मॅच दरम्यानच्या मागच्या वर्षीच्या हिंसाचारासाठी २१ तरुणांना फाशीची शिक्षा देण्यात आली. कोर्टाच्या या निर्णयाविरुद्ध निषेध सुरू झाला. तो दडपण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात ४० लोक मरण पावले. दोन वर्षांपूर्वी मुबारकविरुद्धच्या कैरोतील निदर्शनात काही-शे निदर्शकांना ठार मारूनही एकाही लष्करी अधिकाऱ्यावर काहीही कारवाई झालेली नाही या दुटप्पी न्यायव्यवस्थेविरुद्ध लोक निषेध नोंदवत आहेत. इतकेच नव्हे तर आता मोहम्मद मोर्सी फक्त मुस्लिम ब्रदरहूडचा (निवडणुकीत हा पक्ष सत्तेवर आला.) अध्यक्ष आहे, इजिप्तचा नाही; आमचा तर नाहीच नाही अशी पोर्ट सैदच्या नागरिकांची भावना आहे. त्यामुळे पोर्ट सैद हे स्वतंत्र राष्ट्र आहे, त्याचा इजिप्तशी संबंध नाही अशी विघटनवादी भूमिका पुढे येत आहे. म्हणजे, मालीसारखीच विघटनाची शक्यता दिसते.

या प्रक्रियेचा पहिला टप्पा सीरियात चालू आहे. गेली दोन वर्षे तेथे हिंसाचार चालू आहे कारण हुकूमशहा बशर असार सत्ता सोडायला तयार नाही. आधी सामान्य नागरिक विरोधक म्हणून रस्त्यावर आले. आता लष्करातून बाहेर पडलेले सैन्यदल आहे. पण त्यांच्याकडे सरकारी फौजांचा निर्णायक पराभव करू शकेल एवढे शस्त्रबळ नाही. त्यामुळे गेले अनेक महिने ना कोणाची जीत, ना कोणाची हार अशी परिस्थिती आहे त्यात विरोधकांच्यात मुस्लिम मूलतत्त्ववाद्यांनीही प्रवेश केला आहे. ते कडवे सुन्नी असल्याने सहिष्णु सुन्नी व शियापंथीयांच्या विरोधात आहेच. (राजवट शिया आहे.) राजवटीला इराण (शिया असल्याने) व रशिया (लष्करी तळांसाठी) पाठिंबा आहे. मागील एक-दोन लेखांत म्हटल्याप्रमाणे सीरियामधील यादवी शिया-सुन्नी पंथीयांच्यात आहे. सुरूवातीला लोकशाहीची मागणी होती आता फक्त असदला हलवा एवढीच मागणी आहे. मानवी वेदनेचा अंदाज पुढील आकडेवारीवरून यावा. आजवर राजवटीने किंवा विरोधकांनी मिळून ६०,००० लोक ठार मारले आहेत. किमान ४० लाखांना अन्नपाण्याची किंवा वैद्यकीय मदतीची जरूरी आहे (सीरियाची लोकसंख्या सव्वादोन कोटी). २० लाख लोक देशांतर्गत विस्थापित झाले आहेत. दीड लाख शेजारच्या जॉर्डन, तुर्कस्तान, लेबॅननमध्ये निर्वासित म्हणून गेले आहेत आणि छावण्यांत राहत आहेत. हा देश दरघडीला डोळ्यांदेखत बेचिराख होत आहे असे युनोच्या खास प्रतिनिधींचे मत आहे.

या प्रमाणावरच्या नरसंहाराच्या पटलावर साम्राज्यवाद-प्रभुत्ववाद या संकल्पना शिळ्या झाल्यासारख्या वाटतात. मालीच्या उदाहरणावरून दुबळ्या केंद्रसत्तेमुळे लोकशाहीही कशी निष्प्रभ ठरते ते दिसते.

या तीन उदाहरणांच्या संदर्भात आणखी एक गोष्ट लक्षात ठेवणे अगत्याचे आहे. ती म्हणजे बहुसंख्य सहिष्णु मुस्लीम व अतिअल्पसंख्य आतंकवादी यांच्या एकत्रित असण्याच्या दुर्घटनेमुळे संपूर्ण धर्मावरच माथेफिरूपणाचा व हिंसकतेचा शिक्का बसतो. इस्लाम व वसाहतवाद दोन्हींना सतत जबाबदार धरणे चुकीचे आहे. मलेशिया, इंडोनेशिया याही वसाहती होत्या आणि तेथे मुस्लीम बहुसंख्य आहेत. तेथे कडवा आतंकवाद सरकारला वेठीला धरेल असे दिसत नाही. तो आफ्रिका-मध्यपूर्वेतच दिसतो. म्हणजे यात धर्माचा संबंध नसावा.

*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*